| | |
|---|---|
| MHWS090004332022 | दाखल दिनांक : १९.०३.२०२२<br>नोंदणी दिनांक : १९.०३.२०२२<br>निकाल दिनांक : ०२.०५.२०२६<br>कालावधी : ०४ व., ०१ म., १३ दि. |

**<u>प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, (न्यायालय क्र. २), मानोरा यांचे न्यायालयात</u>**

(पिठासीन अधिकारीः श्रीमती तृष्णा गो. बन्सोड)

**नियमित फौजदारी खटला क्र. ६७/२०२२** **निशाणी क्र.–६९**

गुन्हयाचा तपशिल

गुन्हा क्र. : ७४८/२०२१

पोलीस स्टेशन : मानोरा पोलीस स्टेशन, मानोरा.

| | |
|---|---|
| अभियोगपक्ष | महाराष्ट्र शासन तर्फे– पोलीस ठाणे अधिकारी, मानोरा तालुका पोलीस स्टेशन, मानोरा. |
| अभियोगपक्षातर्फे | विशेष सहा. सरकारी अभियोक्ता– श्री. एम. जी. शर्मा |
| आरोपी पक्ष | सुरज उर्फ शेख इरफान व इतर |
| आरोपी पक्षातर्फे | विद्वान विधीज्ञ श्री. एम. एस. इंगोले |

**<u>गुन्हयाचा तपशिल</u>**

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | २६/०६/२०२० ते दि.२६१८/११/२०२१ |
| प्रथम खबरी अहवाल तारीख | १८/११/२०२१ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | ११/०३/२०२२ |
| दोषारोप निश्चित तारीख | ०८/०१/२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ०४/०२/२०२६ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | –– |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०२/०५/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | –– |

(न्यायनिर्णय)

## आरोपींचा तपशिल

| आ. क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीन तारीख | गुन्हा कलम | निर्दोष सोडले किंवा शिक्षा दिली | शिक्षेचे स्वरुप | जेलमध्ये बंद असलेला कालावधी –कलम ४२८ फौ.प्र.सं. प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **सुरज उर्फ शेख ईरफान शेख गणी शेख नुर**<br>२६ वर्षे, धंदाः मेकॅनिक | अटक केली नाही | -- | भा.दं.सं. कलम ४९८–अ, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ व हुंडाबंदी अधिनियचमे कलम ४ अन्वये | निर्दोष सोडले | -- | -- |
| २. | **शेख गणी शेख नुर**<br>वयः४७ वर्षे, धंदाः मजुरी | | | | | | |
| ३. | **सायराबी शेख गणी**<br>वयः४४ वर्षे, धंदाः घरकाम | | | | | | |
| ४. | **शेख साहील शेख गणी**<br>वयः१९ वर्षे, धंदाः मजुरी | | | | | | |
| ५. | **गुलशन उर्फ गुड्डी शेख सद्दाम**<br>वयः२४ वर्षे, धंदाः घरकाम<br>रा. चंद्रशेखर आझाद नगर, भाबरा–दाहोद रोड भवरा, अलीराजपुर, जि.अलीराजपुर, मध्यप्रदेश | | | | | | |
| ६. | **मुस्कान सद्दाम शेख**<br>वयः२२वर्षे, धंदाः घरकाम<br>आ.क्र.१ ते ४ व ६ रा. बिलालनगर, वाशिम, जि.वाशिम | | | | | | |

(न्यायनिर्णय)

# न्या य नि र्ण य

(पारित केल्याचा दिनांक ०२/०५/२०२६)

प्रस्तुतचा खटला आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ४९८(अ), ३२३,५०४, ५०६ सहकलम ३४ व हुंडा बंदी अधिनियमचे कलम ४ नुसार न्यायप्रविष्ठ आहे.

**सरकार पक्षाची थोडक्यात हकीकत अशी आहे की,**

२. फिर्यादी नामे खुशबु गुलफाम शेख सुरज उर्फ ईरफान शेख हि आ.क्र.१ ची पत्नी व इतर आरोपी हे तिचे पतीचे नातेवाईक आहेत. तिचे लग्न आ.क्र.१ सोबत दि.२६/०६/२०२० रोजी झाले. लग्नामध्ये फिर्यादीच्या वडीलांनी तिला रोख रक्कम २० हजार रुपये, सोन्या–चांदीचे दाग–दागिने व संसारउपयोगी भेटवस्तु दिल्या होत्या. लग्नानंतर फिर्यादी आरोपींचे घरी एकित्रित कुटुंबात नांदावयास गेली. लग्नानंतर आरोपींनी तिला दिड महिच्यापर्यंत चांगली वागणुक दिली. आरोपींनी तिला तुझा बाप ट्रक ड्रायव्हर आहे, ट्रकवर चोरी करुन तुला सर्व आंधन दिले, आमच्या मनासारखे आंधन दिले नाही असे म्हणून तिला अपमानित करीत होते. आ.क्र.१ ने दुकान घेण्यासाठी माहेरवरुन दोन लाख रुपये आणण्यासाठी तगादा लावून तिला शारिरीक व मानसिक त्रास देणे सुरु केले. फिर्यादी गर्भवती असतांना तुझ्या गर्भातील बाळ माझा नाही असे म्हणून शिवीगाळ केली व तिला घरातून हाकलून दिले. तेंव्हापासून फिर्यादी तिच्या माहेरी राहत आहे. आ.क्र.१ हा तिच्या माहेरी येवून फिर्यादीस व तिच्या आई–वडीलांना शिवीगाळ केली व जीवाने मारण्याची धमकी दिली. त्याअनुषंगाने फिर्यादीने घडलेल्या घटनेबाबत मानोरा पोलिस स्टेशन येथे तक्रार दिली.

३. पोलीसांनी आरोपींविरुध्द गुन्हा क्र. ७४८/२०२१ प्रमाणे भारतीय दंड संहिताचे कलम ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ व हुंडाबंदी अधिनियचे

कलम ४ अन्वये गुन्हा नोंदविला. तपासिक अंमलदार यांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला, साक्षीदारांचे बयाण नोंदविले व तपासाअंती आरोपींविरुध्द दोषारोप पत्र दाखल केले.

४. आरोपींविरुध्द भा.दं.वि. चे कलम ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ व हुंडाबंदी अधिनियम चे कलम ४ अन्वये दोषारोप (निशाणी क्र.४१) निश्चित केले. आरोपींना दोषारोप वाचुन व समजावून सांगितला असता त्यांनी तो अमान्य केला व प्रकरण सुरु ठेवण्याची तयारी दर्शविली. आरोपींची जबानी निशाणी क्र.४२ ते ४७ वर आहे. सरकारपक्षाने आरोपींविरुध्दचे दोषारोप सिध्द करण्यासाठी केवळ एक साक्षीदार, सा.क्र.१ खुशबु गुलफान शेख सुरज (फिर्यादी) यांना नि.क्र.५४ वर तपासले आहे. मुळ फिर्यादीतर्फे नि.क्र.५९ दाखल करुन पुरावा बंद करण्याचे कथन केले. तसेच सहा. सरकारी अभियोक्ता यांनी पुढे कुठलेही साक्षीदार तपासायचे नसल्याचे कथन केले. त्या अनुषंगाने आदेश नि.क्र.१ वर पारीत करण्यात आला. आरोपींविरुध्द पुरक पुरावा उपलब्ध नसल्यामुळे त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहिताचे, कलम ३१३(१)(ब) नुसार बयाण नोंदविण्यात आले नाही.

५. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

६. सरकार पक्षाचे हकीकत व आरोपीचा बचाव यावरुन निराकरणासाठी खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष, कारणमीमांसासह खालीलप्रमाणे आहेः–

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष हे सिध्द करते काय की, दिनांक २६/०६/२०२० ते दि.१८/११/२०२१ पुर्वीपर्यंत ग्राम–बिलालनगर, वाशिम, जि.वाशिम येथे आरोपींनी आपसी संगणमताने फिर्यादी सौ. खुशबु गुलफान शेख सुरज उर्फ ईरफान शेख हिच्याकडे रुपयांची | **...नाही** |

| | | |
|---|---|---|
| | मागणी करुन तिला शारिरीक, मानसिक छळ केला व तिला क्रुर वागणुक दिली व तसे करुन भारतीय दंड संहिताचे कलम ४९८(अ) सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | |
| २. | अभियोगपक्ष पुढे असे सिध्द करतो काय की, उपरोक्त दिनांक वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीला मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत केली व तसे करुन भारतीय दंड संहिताचे कलम ३२३ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | **...नाही** |
| ३. | अभियोगपक्ष पुढे असे सिध्द करते काय की, उपरोक्त दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसी संगणमताने फिर्यादी हिचा स्वस्थपणा मोडण्याच्या इराद्याने तिचा बुद्धीपुर्वक अपमान केला व तसे करुन भारतीय दंड संहिताचे कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | **...नाही** |
| ४. | अभियोगपक्ष पुढे असे सिध्द करते काय की, उपरोक्त दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसी संगनमताने फौजदारी स्वरुपाचा धाकदपटशा करुन फिर्यादीला जीवे मारण्याची धमकी दिली व तसे करुन भारतीय दंड संहिताचे कलम ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | **...नाही** |
| ५. | अभियोगपक्ष पुढे असे सिध्द करते काय की, उपरोक्त दिनांक वेळी व ठिकाणी आरोपींनी संगणमत करुन फिर्यादीकडून दोन लाख रुपयांची मागणी केली व तसे करुन हुंडाबंदी अधिनियम चे कलम ४ अन्वये गुन्हा केला ? | **...नाही** |
| ६. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

(न्यायनिर्णय)

## का र ण मि मां सा

**मुद्दे क्रमांक १ ते ५ बाबतः–**

७. वरील मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने चर्चेकरीता एकत्रीत विचारात घेण्यात येत आहे. सा.क्र.१ फिर्यादी खुशबु गुलफान ही या प्रकरणातील मुळ फिर्यादी साक्षीदार असुन त्यांनी नि.क्र.५४ वर कथन केले की, आ.क्र.१ तिचा पती असून इतर आरोपी आ.क्र.१ चे नातेवाईक आहेत. तिचे लग्न आ.क्र.१ सोबत वर्ष २०२० मध्ये झाले होते. सदर लग्नानंतर ती आरोपींचे घरी नांदावयास गेली होती. सदर लग्नापासून तिला दोन अपत्ये आहेत. लग्नाचे दोन–तिन महिन्यानंतर आरोपींसोबत तिची बोलचाल झाली होती. याव्यतिरीक्त आणखी काही झाले नव्हते. रागाच्या भरात तिने आरोपींविरुद्ध तक्रार दाखल केली. सदरील साक्षीदाराने अभियोगपक्षास सहकार्य केले नसल्याने सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी त्यांचा उलटतपास घेतला. उलटतपासात या साक्षीदाराकडून अभियोगपक्षास अनुकूल अशी कोणतीही बाब अभिलेखावर आली नाही. सदरील साक्षीदाराने तिचे उलटतपासात आरोपीसोबत न्यायालयाबाहेर आपसी समझोता झाल्याचे मान्य केले. आपसी समझोता नि.क्र.४८ व ४९ वर आहे. फिर्यादी हिने आरोपींनी रुपयांची मागणी केल्याचे, अश्लील शिवीगाळ केल्याचे तसेच मारहाण करुन जीवे मारण्याची धमकी दिल्याबाबत तिने काहीही कथन केलेले नाही. फिर्यादीने कथीत घटनेची बाब स्पष्टपणे नाकारली आहे म्हणून त्यांच्या पुराव्यावर विश्वास ठेवता येत नाही. गुन्हयाचे घटक सिद्ध करण्याइतपत पुरक पुरावा अभिलेखावर आला नाही. अभिलेखावरील पुरावा अरोपींवरील आरोप सिद्ध करण्यास पुरेसा नाही. त्यामुळे मुद्दे क्र. १ ते ५ चे निष्कर्ष 'नकारार्थी' देण्यात येत आहे.

**मुद्दा क्रमांक ६ बाबतः–**

८. वरील सर्व बाबींची तुलनात्मक पडताळणी केली असता असे दिसून येते की, आरोपींनी कथित घटनेच्या दिवशी, वेळी व ठिकाणी फिर्यादीस क्रुर वागणुक देवून रुपयांची

(न्यायनिर्णय)

मागणी केल्याचे शिवीगाळ करुन मारहाण करण्याची तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याची बाब निःसंदेहपणे सिध्द झालेली नाही. अभियोगपक्षाने भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ व हुंडाबंदी अधिनियमचे कलम ४ मधील घटकांची पुर्तता केलेली नाही. त्यामुळे आरोपींना दोषी ठरविता येत नाही, म्हणुन आरोपी निर्दोष मुक्त होणेस पात्र आहेत. करीता वरील सर्व बाबींचा विचार करुन मुद्दा क्र.७ बाबत खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. आ.क्र.१ **सुरज उर्फ शेख ईरफान,** आ.क्र.२ **शेख गणी शेख नुरशेख गणी शेख नुर,** आ.क्र.३ **सायराबी शेख गण,** आ.क्र.४ **शेख साहील शेख गणी,** आ.क्र.५ **गुलशन उर्फ गुड्डी शेख सद्दाम,** आ.क्र.६ **मुस्कान सद्दाम शेख** यांना फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम २४८(१) नुसार भारतीय दंड संहिताचे कलम ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ व हुंडाबंदी अधिनियचमे कलम ४ अंतर्गत शिक्षेस पात्र अपराध केल्याचे आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपींचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७(अ) च्या पुर्ततेकरीता जमानत दाखल करावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by TRUSHNA GOVINDRAO BANSOD
Date: 2026.05.02 17:36:23 +0530

**( तृष्णा गो. बन्सोड)**
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग
(न्यायालय क्र.२), मानोरा.

दि. ०२/०५/२०२६

नि.फौ.ख.क्र. ६७/२०२२

सरकार ..वि.. सुरज उर्फ शेख इरफान व इतर

(न्यायनिर्णय)

प्रमाणपत्र

मी हमी देते की, सदरच्या पी.डी. एफ फाईलमधील मजकुर हा मुळ न्यायनिर्णयातील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखक | | आर. के. चव्हाण<br>लघुलेखक (श्रेणी–३) |
| न्यायालय | | सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर मानोरा |
| न्यायनिर्णय घोषित दिनांक | | ०२/०५/२०२६ |
| न्यायिक अधिकारी यांनी सही केलेले दिनांक | | ०२/०५/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केलेले दिनांक | | ०२/०५/२०२६ |